महाराष्ट्र विधानसभा

दुसरे अधिवेशन, २०१९

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

फुंडे (ता.उरण, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील पाण्याची टाकी कोसळल्याबाबत

(१) ८१२३८ (१४-०४-२०१७). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फुंडे (ता.उरण, जि.रायगड) ग्रामपंचायत हददीतील सुमारे १२-१३ वर्षापूर्वी बांधलेली पाण्याची साठवण टाकी कोसळल्याची घटना माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेमुळे जिल्हयातील सर्वच पाण्याच्या साठवण टाक्यांचे पुनसर्वेक्षण करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार जिल्हयातील सर्वच पाण्याच्या साठवण टाक्यांचे पुनसर्वेक्षण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (२५-०७-२०१९) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) ग्रामपंचायतीने व सिडकोने सुचविलेल्या ठिकाणी सदर योजनेच्या टाकीचे बांधकाम जुलै, २००५ ते फेब्रुवारी, २००७ या कालावधीत करण्यात आले. सदर जागा दलदलीची होती. याबाबत आवश्यक ती काळजी घेण्यात आली होती. दरम्यान सदर टाकी दिनांक २७.१२.२१६ रोजी कोसळली. याबाबत संबंधितांची विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

(४) जे जलकुंभ (पाण्याच्या टाक्या) आयुष्यमान कमी झाल्यामुळे व देखभाल दुरुस्ती न झाल्यामुळे मोडकळीस आलेले आहेत अशा जलकुंभांचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन घेण्याबाबत रायगड जिल्हा परिषदेमार्फत संबंधित ग्रामपंचायतींना कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील महानगरपालिका क्षेत्रातील क्षेपण भुमीची झालेली दुरवस्था

(२) ८२५८५ (०६-०५-२०१७). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषतः महामुंबईतील महानगरपालिका क्षेत्रातील क्षेपण भुमींची दुरवस्था झाल्यामुळे सदर भागातील नागरी व निमनागरी नागरिकांचे जीवनमान सुसह्य करण्याच्या आवश्यकतेसाठी विशेष प्रणालीद्वारे विवक्षित संगणकीय सोयी-सुविधांचा लाभ प्रत्यार्पित करण्याच्या दृष्टीकोनातून संबंधित पर्यावरणीय संतुलन राखण्यासाठीची मागणी जिल्हा औद्योगिक क्षेत्रे व त्यांची उपकार्यालये यांच्याकडे माहे फेब्रुवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान संबंधित जिल्हा पर्यावरण प्रशासन व त्यांच्या आधिपत्याखालील व्यवस्थापनाकडे तसेच लोकप्रतिनिधी यांनी मा.पर्यावरण मंत्री, मा.पर्यावरण राज्यमंत्री, प्रधान सचिव (पर्यावरण), संबंधित जिल्ह्यांचे प्रदूषण नियंत्रणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संबंधित प्रदूषण नियंत्रण प्राधिकारी यांच्याकडे केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (१६-०७-२०१९) : (१) व (२) सदर बाबत निवेदन प्राप्त झाल्याचे कार्यालयीन अभिलेखावर दिसून येत नाही.

मुंबई महानगरपालिका हद्दीत कांजुर, देवनार व मुलुंड या तीन क्षेपणभुमी आहेत. कांजुर क्षेपणभुमी या ठिकाणी कंपोस्टींग आणि बायोरियाक्टर लँन्डफिल पध्दतीने विल्हेवाटी करण्यात येते. तसेच देवनार क्षेपन भुमी येथे ३०००-४००० मे.टन प्रतिदिन घनकचऱ्याचे अशास्त्रोक्त पध्दतीने कोणतीही प्रक्रीया न करता डंम्पिंग करण्यात येते.

मुलुंड डंपिग ग्राऊड येथे घरगुती कच-यावर प्रक्रिया करण्याकरीता मुंबई महानगरपालिकेने बायोमायंनिग प्रा.लि. या कंपनीला निवीदा पध्दतीने काम दिलेले आहे. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी घरगुती कचरा टाकण्याचे काम जानेवारी २०१९ पासून बंद केलेले आहे. उपरोक्त क्षेपणभूमीची वेळोवेळी पहाणी केली जाते पाहणी दरम्यान आढळलेल्या तृटींच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत निर्देश देण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

गोदावरी नदी प्रदुषणमुक्त करण्याबाबत

(३) ९५३८० (३०-१२-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.संग्राम थोपटे (भोर) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोदावरी नदी प्रदुषणमुक्त करण्यासाठी नाशिक महानगरपालिका निरीने सुचविलेल्या नियमांचे पालन करीत असले तरी प्रत्यक्षात गोदावरी नदीमध्ये सांडपाणी सोडले जात असल्याची बाब माहे ऑगस्ट २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोदावरी प्रदुषणास नागरीकांबरोबरच महानगरपालिका प्रशासन देखील जबाबदार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार गोदावरीचे प्रदुषण रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (०४-०७-२०१९) : (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

रायगड, जळगांव व बुलढाणासह राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये शिक्षक व मुख्याध्यापकांची ३० हजाराहून अधिक पदे रिक्त असल्याबाबत

(४) ९७२३१ (२९-१२-२०१७). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जळगांव व बुलढाणासह राज्यातील शिक्षक व मुख्याध्यापकाची ३० हजाराहून अधिक पदे रिक्त असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील शैक्षणिक संस्थेत मुख्याध्यापक, केंद्र प्रमुखांची व सहाय्यक शिक्षकांची तसेच अधिकाऱ्यांची ६० ते ८० टक्के पदे रिक्त असल्याने शैक्षणिक महाराष्ट्र अभियान असफल झाल्याबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांच्या माहे जुलै-सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आणले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र घडविण्यासाठी शिक्षकांइतकीच महत्वाची भूमिका मुख्याध्यापकांची असतानाही ७० टक्के शाळांमध्ये मुख्याध्यापक पद प्रभारीवर असून केंद्र प्रमुखांची ५० टक्के पदे व सहाय्यक शिक्षकांची अनेक पदे रिक्त असल्यामुळे कार्यरत कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच जिल्हा परिषद रायगड अंतर्गत शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांची ४६ पदे गत ८ वर्षापासून रिक्त असून गट शिक्षणाधिकाऱ्यांच्या १५ पदापैकी १३ पदे, उप शिक्षणाधिकाऱ्यांची २ पदे व जिल्हा शिक्षणाधिकारी यांची २ पदे रिक्त असून जळगांव जिल्हयात बीईओ, शिक्षण विस्तार अधिकारी, विस्तार अधिकारी, शालेय पोषण आहार अधिक्षक, जि.प. शाळा केंद्र प्रमुख इत्यादी एकूणच शिक्षण विभागातील ७२ महत्वाची पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, बुलढाणा जिल्हयात गट शिक्षणाधिकाऱ्यांची १३ पदे मंजूर असताना केवळ ५ पंचायत समित्यांमंध्ये कायमस्वरुपी गटशिक्षणाधिकारी काम पहात असून अन्य पंचायत समित्यांमध्ये शिक्षण विभागाचे कामकाज प्रभारीवर असल्याचे तसेच माध्यमीक शिक्षण विभागात उप शिक्षणाधिकारी यांचेसह एकूण ११ पदे रिक्त असून ६०० शाळांचे काम केवळ ८ कर्मचारी सांभाळत असल्याचे माहे नोव्हेंबर २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदशर्नास आले आहे, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. आशिष शेलार (०८-०७-२०१९) : (१) व (२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) पदोन्नतीची पदे भरणेबाबत जिल्हा परिषद स्तरावरुन कार्यवाही करण्यात येते. सरळसेवेची रिक्त पदे भरणेबाबत "पवित्र" या पोर्टलमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात जनावरांच्या ऑक्सिटॉसिन इंजेक्शनचा वापर मानवी प्रसुती प्रक्रियेसाठी केला जात असल्याबाबत

(५) ९८५९२ (२९-१२-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.उदेसिंग पाडवी (शहादा) : सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये जनावरांच्या वापराकरिता असणारे ऑक्सिटॉसिन या इंजेक्शन्सचा वापर मनुष्यावर करण्यासाठी जवळपास ५२५०० इंजेक्शन्स बाजारात उपलब्ध करण्यात आल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे (जि.ठाणे) येथे उक्त इंजेक्शनवर चुकीची माहिती नोंदवून त्यांची विक्री मानवी प्रसुती प्रक्रियेसाठी केली जात असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान अन्न व औषध प्रशासनाने केलेल्या कारवाईत निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी आढळणा-या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार रावल (१६-०५-२०१९) : (१) व (२) हे खरे आहे.

(३) उक्त घटनेची अन्न व औषध प्रशासनाने चौकशी केली असून सदर औषधाचे बाह्य आवरणावर (Blister pack) आतिल ॲम्पुल्स वरील लेबलप्रमाणे Not for Human use, Animal treatment Only असे छापले नसल्याचे आढळले. मात्र Blister pack वर Ad Directed by Physician असे छापलेले आढळले. यावरुन सदर औषध जनावरांच्या वापरासाठी आहे किंवा मानवी वापरासाठी आहे याबाबत संभ्रम असल्याचे आढळून आले.

सदर प्रकरणी मे.लाईफ केअर मेडीको, ठाणे या किरकोळ औषधी परवाना धारकाचे भागीदाराने सदर औषधावरील Blister pack काढून टाकल्याचे तपासात आढळून आले आहे.

याबाबत पुरवठादार मे.श्री.जैन फार्मा, ठाणे यांच्याकडून चाचणीस्तव घेण्यात आलेले नमूने अप्रमाणित घोषित करण्यात आले आहेत. सदर औषधाची विक्री व वापर थांबविण्याचे व वितरीत झालेला साठा परत मागविण्याचे आदेश सर्व संबंधितांना देण्यात आले आहेत.

मे. लाईफ केअर मेडीको यांच्याकडून ८२ ॲम्पुल्स, मे.श्री. जैन फार्मा यांच्याकडून २१४ ॲम्पुल्स, आधार रुग्णालय, ठाणे यांच्याकडून ०३ ॲम्पुल्स व मे.युनायटेड फार्मा, कामोठे, रायगड यांच्याकडून २८१९ ॲम्प्युल्स चा साठा जप्त केला आहे.

सदर प्रकरणी मे.लाईफ केअर मेडीको या किरकोळ औषध विक्रेता पेढीचे परवाने दि१६.०२.२०१७ पासून रद्द करण्यात आले असून दि.१९.११.२०१७ रोजी जबाबदार व्यक्ती विरुध्द प्रथम खबर अहवाल दाखल करण्यात आला असून गुन्हा नोंद क्रमांक I-४०६/२०१७ असा आहे.

तसेच कृष्णा मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स, ठाणे यांचेकडून विक्री झालेल्या ११ ॲम्प्युल्सबाबत पुढील तपास कारवाई पोलिसांमार्फत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पैठण शहरात (जि.औरंगाबाद) रुग्णालयातील टाकण्यात येणाऱ्या जैविक कचऱ्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाल्याबाबत

(६) १११७३६ (११-०४-२०१८). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण शहरात (जि.औरंगाबाद) विविध ठिकाणी रुग्णालयातील व छोटया मोठ्या दवाखान्यातील जैविक कचरा टाकण्यात येत असल्याने शहरातील नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जैव वैद्यकिय कचऱ्याचे संकलन करणाऱ्या वॉटरप्रेस प्रॉइक्ट कंपनीकडे पैठण शहरातील अनेक डॉक्टरांनी नोंदणीच केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, तदनुसार शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (०४-०७-२०१९) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

रंकाळा (जि.कोल्हापूर) तलावात परिसरातील निसर्ग माहिती केंद्र बंद अवस्थेत असल्याबाबत

(७) ११४५९२ (०६-०४-२०१८). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजनेंतर्गत कोल्हापूर शहराच्या ऐतिहासिक रंकाळा तलाव परिसरात रु.३५ लाख खर्च करून निसर्ग माहिती केंद्र उभारण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जवळपास आठ वर्षे या केंद्राच्या इमारतीचा वापर होत नसल्याने या केंद्राची अत्यंत दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निसर्ग माहिती केंद्र सुरु करून कोल्हापूर शहरामध्ये पर्यावरणविषयक विविध उपक्रम राबाविण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करणेत येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (२४-०७-२०१९) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) अतिरीक्त आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका यांच्या अहवालानुसार निसर्ग माहिती केंद्राची इमारत सद्यस्थितीमध्ये सुस्थितीत आहे. तसेच सदरील केंद्रातील एक दालन कोल्हापूर शहरातील आपत्कालीन परिथितीमध्ये मदत करणाऱ्या व्हाईट आर्मी या सामाजिक संस्थेस विनाशुल्क वापरणेकरिता देण्यात आली आहे. तसेच उर्वरित दालन सामाजिक संस्था, अशासकीय संस्था यांचे मार्फत पर्यावरण विषयक विविध उपक्रम राबविणेकामी पत्रव्यवहार, निवेदन इ. मार्फत कोल्हापूर महानगरपालिका प्रयत्नशील आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

शहरातील सांडपाणी व कारखान्यातील दुषित पाण्यामुळे मुंबईसह कोकणची किनारपट्टी प्रदूषित होत असल्याबाबत

(८) ११५१३१ (१४-०४-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहरातील सांडपाणी व कारखान्यातून येणा-या दुषित पाण्यामुळे मुंबईसह कोकणाची किनारपट्टी प्रदूषित होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, किनारपट्टीवर लाल तवंग आल्याने तेथील मासेमारी बंद आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रदूषण तातडीने रोखण्याबाबत शासनाने काय उपाययोजना केली आहे अथवा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (१६-०७-२०१९) : (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे लासलगाव (ता.निफाड, जि.नाशिक) येथील शिवनदीवरील जलाशयाच्या संवर्धनासाठी निधी मिळण्याबाबत

(९) ११७७९९ (२३-०७-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे लासलगाव (ता.निफाड जि.नाशिक) येथील शिवनदीवरील जलाशयाच्या पर्यावरण संवर्धनासाठी राज्य सरोवर संवर्धन योजनेतून निधी मिळण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ जानेवारी, २०१८ व दिनांक २७ फेब्रुवारी, २०१८ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांचेकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतचा प्रस्ताव नाशिक जिल्हा परिषदेने शासनास सादर केला आहे काय,
(३) त्यानुसार उक्त प्रस्तावास मान्यता देवून मौजे लासलगाव येथील शिवनदीवरील जलाशयाच्या पर्यावरण संवर्धनासाठी निधी मंजुरीकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (२४-०७-२०१९) : (१) होय हे खरे आहे.
(२) नाही.
(३) व (४) जिल्हा परिषद, नाशिक यांचेमार्फत प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सूरू आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी कळविल्यानुसार नाशिक जिल्हयात स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघ व शिक्षक मतदार संघाची आदर्श आचारसंहिता संपुष्टात आली आहे. त्याप्रमाणे ग्रामपंचायतीने ग्रामसभा घेऊन तात्काळ प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. प्रस्ताव प्राप्त होताच तात्काळ कार्यवाही करण्यात येईल.

मागाठाणे (मुंबई उपनगर) येथील स्थानिकांच्या समस्यांबाबत

(१०) १२३६३५ (२३-०७-२०१८). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागाठाणे (मुंबई उपनगर) विधानसभा मतदार संघातील स्थानिकांच्या विविध समस्या सोडविण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २० जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.पर्यावरण मंत्री यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (१६-०७-२०१९) : (१) निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर शहरात सुगंधित तंबाखु व खर्रा इत्यादीची होत असलेली विक्री थांबविण्याबाबत

(११) १२९६९६ (२९-१२-२०१८). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात दिनांक १६ व १७ जुलै, २०१८ रोजी अन्न व औषधी प्रशासनाकडून पानटपऱ्यांवर धाड टाकण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कार्यवाहीत किती तंबाखु, खर्रा इ. जप्त करण्यात आला होता तसेच सदर तंबाखु व खर्रा कोठून आणण्यात आला होता,

(३) असल्यास, शासनाकडून सुगंधित तंबाखु, खर्रा इत्यादीची विक्री थांबविण्याबाबत कोणती व्यापक मोहिम राबविण्यात आली तसेच कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार रावल (१४-०५-२०१९) : (१) हे खरे आहे.

(२) सदर कारवाईत एकूण ०६ पानटपऱ्यांमधून २.४४४ किलो ग्रॅम वजनाचा व रुपये १६६५/- किंमतीचा प्रतिबंधित खर्रा व सुगंधीत तंबाखुचा साठा जप्त करण्यात आला असून सदर पेढ्यांना सीलबंद करण्यात आले आहे. सदर खर्रा पेढ्या स्वत: तयार करुन ग्राहकांना विक्री करीत असल्याचे आढळले.

(३) शासनाने गुटखा व तत्सम पदार्थांवर आळा घालण्यासाठी दि.२१.०७.२०१२ पासून सदर प्रदार्थांच्या विक्री, साठवणूक व विक्रीस प्रतिबंध घातला आहे. तसेच दि.०९.०१.२०१८ पासून खाद्यपदार्थासोबत तंबाखु व तंबाखुजन्य पदार्थ विक्रीस प्रतिबंध घातला आहे.

अन्न व औषध प्रशासनाने सन २०१७-१८ मध्ये नागपूर शहरात १७ प्रकरणी कारवाई करुन ४५०४.७ किलो ग्रॅम वजनाचा व रुपये ३२,९३,४३२/- किंमतीचा साठा जप्त केला आहे. त्यापैकी १६ प्रकरणी संबंधितांविरुध्द न्यायालयात खटले दाखल करण्यात आले असून उर्वरीत १ प्रकरण मंजूरीसाठी प्रलंबित आहे.

सन १ एप्रिल, २०१८ ते ३१ डिसेंबर, २०१८ या कालावधीत नागपूर शहरात ०९ प्रकरणी कारवाई करुन १२१५.८९८ किलो ग्रॅम वजनाचा व रुपये २१,२१,६०२/- किंमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील स्वस्त धान्य दुकानदारांच्या मागण्यांवर निर्णय घेणेबाबत

(१२) १३५०२३ (१०-०७-२०१९). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील स्वस्त धान्य दुकानदारांना नवीन वितरण प्रणालीत पुरेसे पैसे मिळत नसल्याने कमीशन ऐवजी पगार द्यावा यासह इतर मागण्यांसाठी जळगांव जिल्ह्यातील रेशन दुकानदारांनी दिनांक ०५ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास जळगांव जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वस्त धान्य दुकानदारांच्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे, सदर मागण्यांवर कोणता निर्णय घेण्यात आला व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच राज्यातील स्वस्त धान्य दुकानदारांच्या समस्या लवकरात लवकर मार्गी लावण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे व त्याची फलनिष्पत्ती काय आहे ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०९-०८-२०१९) : (१) होय.

(२) व (३) रोख सबसिडी नको धान्य द्यावे, मार्जिन नको मानधन द्यावे. देशभरातील दुकानदारांना रु.२५० ते ३००/- प्रति क्विंटल कमिशन द्यावे इ. रेशन दुकानदारांच्या

अडीअडचणी व विविध मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मा.मंत्री (अनापुवग्रासं) यांनी दि.७.१.२०१९ रोजी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीत चर्चेअंती रेशन दुकानदारांना मानधन देता येणार नाही. तथापि, त्यांच्या कमिशनमध्ये वाढ करण्याबाबत मा.मंत्री किंवा प्रधान सचिव (अनापुवग्रासं) हे केंद्रीय खाद्य व आपूर्ती मंत्री यांचेशी चर्चा करतील, असा निर्णय घेण्यात आला.

त्या अनुषंगाने, शासन निर्णय दि.७.९.२०१७ अन्वये रेशन दुकानदारांच्या उत्पन्नात वाढ व्हावी या दृष्टीने फ्री-सेल केरोसीन तसेच ५कि.ग्रॅ.चे लहान सिलेंडर्स यांचे रास्तभाव दुकानदार व केरोसिन विक्रेते यांना वितरण करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील हॉकर्स व किरकोळ केरोसीन परवाना धारकांना वाटपासाठी केरोसीन मिळणेबाबत

(१३) १३५३७० (१०-०७-२०१९). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पुरवठा विभागाकडून अर्धघाऊक केरोसीन विक्रेत्यांना दरमहा नियमित केरोसीन वितरित केले असूनही बुलढाणा जिल्ह्यातील हॉकर्स व किरकोळ केरोसीन परवाना धारकांना वाटपासाठी केरोसीन मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार बुलढाणा जिल्ह्यातील हॉकर्स व किरकोळ केरोसीन परवाना धारकांना केरोसीन मिळणेबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२९-०७-२०१९) : (१) व (२) शासन परिपत्रक दिनांक ०१ ऑगस्ट, २०१८ मधील सुचनांनुसार गॅसजोडणी नसल्याबाबतचे हमीपत्र सादर करणा-या शिधापत्रिकाधारकांसाठी शासनाकडून बुलढाणा जिल्हयाच्या मागणीच्या १०० % केरोसिन नियतन मंजूर करण्यात येत आहे. तसेच हॉकर्स व किरकोळ केरोसिन परवानाधारकांना जोडण्यात आलेल्या शिधापत्रिकांपैकी हमीपत्र सादर करणा-या शिधापत्रिकांच्या संख्येनुसार त्यांना केरोसिन नियतन मंजूर करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

उरण (जि.रायगड) तालुक्यातील पाणी टंचाईबाबत

(१४) १३५८७० (११-०७-२०१९). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण तालुक्यात (जि.रायगड) रानसई व पूनाडे ही दोन धरणे असतांना आजही उरण तालुक्यातील नागरिकांना पाण्याची भिषण टंचाई भासत असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या गावातील पाणी टंचाई दूर करण्याकरिता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे, असल्यास, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (२६-०७-२०१९) : (१) हे खरे आहे.
(२) उन्हाळयात पुनाडे धरणातील पाण्याची पातळी कमी झाल्यामुळे पुनाडे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतील आठ गावांना काही प्रमाणात पाणी टंचाई जाणवते. उर्वरित ग्रामपंचायतींना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) व शहर व औद्योगिक विकास महामंडळाच्या (सिडको) हेटवणे मुख्य जलवाहिनीवरुन पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

ग्रामपंचायत रानसई क्षेत्रातील खैरकाटी, भूऱ्याचीवाडी या दोन वाडयांना टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे व इतर वाडयांना साधी विहिर, विंधन विहिरींव्दारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

रानसई येथील धरणाची पाणी पातळी उन्हाळयात खालावल्यामुळे रानसई व चिरनेर ग्रामपंचायत क्षेत्रातील पाडयांचे पाण्याचे स्त्रोत आटतात. रानसई ग्रामपंचायत क्षेत्रातील ६ वाडयांसाठी करण्यात आलेली पाणी पुरवठा योजना पुरेशा विद्युत पुरवठयाअभावी बंद आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

रत्नागिरी जिल्ह्यातील लोकमान्य टिळक यांच्या जन्मस्थळाची दुरवस्था झाल्याबाबत

(१५) १३५९६२ (११-०७-२०१९). श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्ह्यातील लोकमान्य टिळक यांच्या जन्मस्थळाच्या छताची कौले निखळली असून अंतर्गत भागाची पूर्णतः हानी झाली असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लोकमान्य टिळकांच्या स्मारकाच्या दुरूस्तीसाठी सुमारे रुपये अडीच कोटीं निधीचा प्रस्ताव शासनाकडे अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्वातंत्र्यासाठी आयुष्य वेचणा-या लोकमान्य टिळकांच्या स्मारकाच्या दुरूस्तीला निधी देण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२७-०८-२०१९) : (१) सदर स्मारक सुस्थितीत असून माकडांच्या वावरामुळे छतावरील गावठी कौले काही प्रमाणात विस्कळीत झाली आहेत. सदर कौलांची साकारणी प्राधान्याने करण्यात येत आहे. अंतर्गत भागाची कोणत्याही प्रकारची हानी झालेली नाही.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील ८३ किल्ले 'राज्य संरक्षित स्मारक' म्हणून घोषित करण्यात आल्याबाबत

(१६) १३६१६९ (११-०७-२०१९). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ८३ किल्ले 'राज्य संरक्षित स्मारक' म्हणून घोषित करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गड-किल्ले संवर्धन समिती आणि राज्य पुरातत्व विभागाने याबाबतच्या सर्व कागदपत्रांची पूर्तता केली असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या निर्णयामुळे राज्यातील गड-किल्ल्यांवर मोठ्या संख्येने पर्यटक सहभागी होणार असून यामुळे स्थानिक तरुणांना रोजगार उपलब्ध होणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबतची संपूर्ण कार्यवाही कधीपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०६-०८-२०१९) : (१) हे खरे नाही.
तथापि आतापर्यंत ५१ किल्ले राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यात आले आहेत.
(२) राज्य संरक्षित स्मारकांचे जतन व दुरुस्ती करण्यासाठी गडसंवर्धन समिती नेमण्यात आली असून सदर समितीच्या शिफारशी नुसार राज्य संरक्षित गड किल्ल्यांचे जतन व दुरुस्तीची कामे करण्यात येतात.
(३) राज्य शासनामार्फत राज्य संरक्षित गड किल्ल्यांचे जतन व संवर्धन करण्याचे काम करण्यात येते. त्यामुळे पर्यटकांच्या संख्येत वाढ होऊन रोजगार उपलब्ध होतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कांजाळा (जि.नांदेड) येथे विहिरीत पडून एका मुलीचा झालेला मृत्यु

(१७) १३६२४७ (११-०७-२०१९). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुनिल केदार (सावनेर),

डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांजाळा (जि.नांदेड) गावालगत असलेल्या मांडा येथे मागील ६ महिन्यांपासून पाणी टंचाई निर्माण झाली असून एका ऊसतोड कामगाराच्या कुटुंबातील १३ वर्षीय मुलगी पाणी आणण्यासाठी गेली असता तोल जावून विहरीत पडल्याने तिचा बूडून मृत्यू झाला असल्याचे दिनांक ३१ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या मृत मुलीच्या कुटुंबियांना खासबाब म्हणून आर्थिक मदत देण्यासह या तांडयांवर पाणी पुरवण्याची व्यवस्था करणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (२६-०७-२०१९) : (१) हे खरे आहे.

मौजे कांजाळा तांडा येथे मार्च, २०१९ च्या दरम्यान पाणी टंचाई उद्भवली आहे.

(२) सदर बाबत मृत मुलीच्या कुटुंबियांना राजीव गांधी विद्यार्थी अपघात विमा योजनेव्दारे मदत देण्याबाबतचा प्रस्ताव तहसिलदार, लोहा यांच्याकडून गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती लोहा यांना दिनांक २९.०३.२०१९ च्या पत्राव्दारे पाठविण्यात आला आहे.

तथापि, तांडयावर पाणी पुरवठयाची व्यवस्था करण्याच्या दृष्टीने टँकर मंजूर करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

वरळी किल्ल्यावर अनधिकृतरित्या छायाचित्रण करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

(१८) १३६२७२ (१०-०७-२०१९). श्री.सुनिल शिंदे (वरळी) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी येथील समुद्र किल्ल्याचा समावेश हा हेरीटेज दर्जाच्या वास्तूत होत असतानाही किल्ल्याची देखभाल व दुरुस्तीअभावी दुरवस्था झालेली असून शासनाची कोणतीही परवानगी न घेता विविध मालिका, चित्रपट व जाहिराती यांचे छायाचित्रण करणारे किल्ल्याच्या दूरवस्थेत वाढ करीत असल्याची बाब स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास मा.सांस्कृतिक मंत्री आणि संचालक, पुरातत्त्व विभाग मुंबई यांच्या निदर्शनास आणून दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार किल्ल्यावर अनधिकृतरित्या विना परवानगी विविध मालिका, चित्रपट आणि जाहिरातींचे छायाचित्रीकरण करणाऱ्यांवर शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०६-०८-२०१९) : (१) हे खरे नाही.

तसेच किल्ल्यावर होणाऱ्या छायाचित्रणामुळे किल्ल्याच्या दुरवस्थेत वाढ होत असल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

माझगांव (मुंबई) येथील सुर्यकुंड गृह.सोसा.मधील ग्राहकाना भारत गॅसने कमी वजनाचे सिलेंडर पुरविल्याबाबत

(१९) १३६३५७ (१०-०७-२०१९). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील माझगावमधील महापुरुष मार्गावरील श्री.सुर्यकुंड महापुरुष गृहनिर्माण सोसायटीमध्ये माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये घरगुती गॅस ग्राहकांना कमी वजनाचे गॅस सिलिंडर पुरवले गेले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी भारत गॅसच्या विक्री अधिकाऱ्यांनी चौकशी करुन कमी वजनाचे सिलिंडर बदलून दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्राहकांनी त्याबाबत भारत गॅसच्या विभागीय कार्यालयात दिनांक २१ फेब्रुवारी, २०१९ रोजी तक्रार करुनही संबंधितांवर अदयाप कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार ग्राहकांची फसवणूक करणाऱ्यांवर कारवाई होणेसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२९-०७-२०१९) : (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) दिनांक २१.०२.२०१९ रोजी भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमि. या कंपनीस प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली. सदर प्रकरणी भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमि. कंपनीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार संबंधित गॅस एजन्सीला दि.१८.०३.२०१९ रोजी लेखी समज देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक येथे गोरेगावच्या धर्तीवर दादासाहेब फाळके चित्रपटसृष्टी निर्माण करण्याबाबत

(२०) १३६७५२ (१०-०७-२०१९). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे बीओटी तत्वावर गोरेगावच्या धर्तीवर दादासाहेब फाळके चित्रपटसृष्टी निर्माण करण्यासाठी नवीन पूर्वव्यवहार्यता अहवाल मागवून कार्यवाही करण्याचा दिनांक ५ डिसेंबर, २०१७ रोजी मा.मंत्री सांस्कृतिक कार्य विभाग यांनी निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्न भाग (१) बाबत शासनाने कार्यवाही करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २० फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पास मुंढेगाव (ता.इगतपुरी) येथील जागा सांस्कृतिक कार्य विभागास हस्तांतरित करण्यासाठी महसूल व वन विभागाने संमती दिलेली आहे , हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग (१) बाबत पूर्वव्यवहार्यता अहवाल शासनास प्राप्त झालेला आहे काय,

(५) असल्यास, प्रश्न भाग (३) मधील पूर्वव्यवहार्यता अहवालाच्या अनुषंगाने नाशिक येथे चित्रपटसृष्टी निर्माण करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास विलंबाची कारणे काय ?

श्री. विनोद तावडे (०६-०८-२०१९) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) महसूल व वन विभागाकडे कार्यवाही सुरु आहे.

(४) नाही.

(५) तूर्तास प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

पारोळा (जि.जळगांव) येथे शासकिय धान्य खरेदी केंद्रावर ज्वारी व मका खरेदी सुरु करण्याबाबत

(२१) १३६८६१ (११-०७-२०१९). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारोळा (जि.जळगांव) येथे शासकिय धान्य खरेदी केंद्रावर ज्वारी व मका खरेदी करण्यास माहे नोव्हेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान सुरुवात करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी आतापर्यंत किती धान्य खरेदी करण्यात आले व त्याचे पैसे शेतकऱ्यांना देण्यात आले आहेत काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२९-०७-२०१९) : (१) हे खरे आहे.
(२) शासनाने दिलेल्या विहीत मुदतीत पारोळा खरेदी केंद्रावर ३९१ शेतकऱ्यांकडून ७४५२.५० क्विं. ज्वारी व १० शेतकऱ्यांकडून २९१.०० क्विं. मका खरेदी करण्यात आला आहे. त्याची सर्व रक्कम संबंधित शेतकऱ्यांना त्यांच्या बँक खात्यावर ऑनलाईन पध्दतीने अदा करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

येऊर गाव (जि.ठाणे) परिसरातील आदिवासींना मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत

(२२) १३७११० (११-०७-२०१९). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानास लागून असलेल्या येऊर गाव येथील आदिवासी कुटुंबांना अद्याप विदयुत पुरवठा तसेच विविध मुलभूत सोयीसुविधा मिळत नसल्याचे दिनांक ११ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने सविस्तर आराखडा तयार करुन येथील आदिवासी गावांतर्गत विदयुत पुरवठयासह विविध मुलभुत सोयी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. अशोक उईके (०९-०८-२०१९) : (१) व (२) हे खरे नाही.
येऊर गाव परिसरात ठक्करबाप्पा वस्ती सुधारणा कार्यक्रम योजनेअंतर्गत अंतर्गत रस्ते सिमेंट-काँक्रीटीकरण, नाला बांधकाम, नाला भिंत बांधकाम इ. कामे मंजूर करण्यात आलेली आहेत. तसेच जांभूळपाडा व यनिचा पाडा येथे विद्युतीकरणाचे काम मेडा, मुंबई यांचेमार्फत करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील सेवाभावी ब्राम्हण सहाय्यक सहकारी पत संस्थेत झालेला आर्थिक गैरव्यवहार

(२३) १३७१४१ (१३-०७-२०१९). श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील सेवाभावी ब्राम्हण सहाय्यक सहकारी पत संस्थेत ८ कोटी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पत संस्थेतील गुंतवणूकदार व सभासद यांनी त्यांचे पैसे पतसंस्थेच्या व्यवस्थापनाकडे मागीतल्यानंतर व्यवस्थापनाने टाळाटाळ केल्यामुळे हाणामारी झाली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पतसंस्थेच्या व्यवस्थापनाविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे व पतसंस्थेत ज्या ठेविदारांनी पैसे ठेवले त्या ठेविदारांना त्यांचे पैसे परत मिळण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यातयेत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (०८-०८-२०१९) : (१) होय.
(२) नाही.
(३) संस्थेच्या सन २०११-१२ ते २०१५-१६ या ५ वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची छाननी करण्यात आली. त्यानुसार लेखापरिक्षकांनी मागील ५ वर्षाचे फेरलेखापरिक्षण करण्याची शिफारस केली असून त्यानुसार सन २०११-१२ ते २०१५-१६ या कालावधीचे फेरलेखापरिक्षण करण्यासाठी श्री. एस. व्ही. सासवडकर, लेखापरिक्षक श्रेणी-१, सहकारी संस्था, चिपळुण यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

दरम्यान संस्थेचे सन २०१६-२०१७ च्या लेखापरिक्षण अहवालानुसार पतसंस्थेच्या अध्यक्षांनी संस्थेचे संचालक, व्यवस्थापक व अल्पबचत एजंट यांचेविरुध्द चिपळूण पोलीस ठाण्यात एफआयआर क्र.०२२ दिनांक ३१.०१.२०१८ रोजी दाखल केले आहे.

सद्य:स्थितीत पतसंस्थेवर अधिनियमाच्या कलम ७७ अ अन्वये प्राधिकृत अधिकाऱ्याची नियुक्ती दिनांक १०.०५.२०१९ च्या आदेशान्वये करण्यात आलेली आहे. दिनांक ३१.०३.२०१९ अखेर पतसंस्थेच्या सभासदांच्या रु. २.३२ कोटींच्या ठेवी परत करण्यात आलेल्या असून कर्ज वसूलीमधून उर्वरीत ठेवी अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

वेंगुर्ले (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील पाणी टंचाई आराखड्यास मंजूरी देण्याबाबत

(२४) १३७१४८ (०८-०७-२०१९). श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वेंगुर्ले (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील पाणी टंचाई दूर करण्यासाठी वेंगुर्ले पंचायत समितीने तालुक्यातील ७२ वाड्यांसाठी ७८ लाख रक्कमेचा पाणी टंचाई आराखडा अंदाजपत्रकासह तयार करुन सिंधुदुर्ग जिल्हा प्रशासनाकडे मंजूरीसाठी पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आराखड्यामध्ये कोणती कामे अंतर्भुत आहेत व सदर आराखड्यास जिल्हा प्रशासनाने मंजूरी दिली आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (१४-०८-२०१९) : (१) हे खरे आहे.

वेंगुर्ले पंचायत समितीने तालुक्यातील ७२ वाडयांसाठी ७८ लाख रक्कमेचा संभाव्य पाणी टंचाई आराखडा तयार केलेला होता. तथापि, सदर आराखडयाची विभागीय स्तरावर छाननी केल्यावर सदरचा संभाव्य आराखडा ६८ वाडया व रु. ४३.७० लाख इतक्या रक्कमेचा

अंतीम करुन जिल्हयाच्या एकत्रित आराखडयात समाविष्ठ करुन त्यास मान्यता मिळाली आहे.

(२) मंजूर पाणी टंचाई कृती आराखडयातील कामांची माहिती खालीलप्रमाणे आहे:-

अ.क्र.	उपाययोजना	कामांची संख्या
१	नवीन विंधन विहीर घेणे	९
२	विंधन विहीर विशेष दुरुस्ती	५
३	विहीर खोल करणे व गाळ काढणे	३५
४	नळ पाणी पुरवठा योजनांची विशेष दुरुस्ती करणे	१३
५	तात्पुरती पुरक नळ योजना करणे	६

(३) प्रश्न उद्भवत नाही.

शासनाच्या महावितरणने पवन उर्जा प्रकल्पांतून घेतलेल्या विजेची रक्कम थकविल्याबाबत

(२५) १३७२११ (११-०७-२०१९). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या पवन उर्जा प्रकल्पांतून महावितरणने २८०० मेगावॅट घेतलेल्या विजेचे सन २०१७ पासून पैसेच दिले नसल्याची बाब दिनांक १९ फेबुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे या थकबाकीचा आकडा सुमारे ३१०० कोटी रुपयांवर गेला असल्याने या पवनउर्जा प्रकल्पांना आर्थिक अडचणीला समोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने किती निधीची तरतूद केली आहे वा करण्यात येत आहे, तसेच सदर थकबाकी पवन उर्जा प्रकल्पांना अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०८-२०१९) : (१), (२) व (३) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने दिनांक १९/२/२०१८ रोजी पवन ऊर्जा प्रकल्पाचे ३७६५ मे. वॅ.क्षमतेच्या वीज खरेदीचे करार केले होते. दिनांक १९/२/२०१८ रोजी पवन उर्जा प्रकल्पातून खरेदी केलेल्या विजेच्या देयकापोटी थकीत रक्कम रू.२३८२ कोटी होती. महावितरणने पवन ऊर्जा प्रकल्पातील वीज खरेदीपोटी प्रलंबित असलेल्या रक्कमेपैकी दि. ३१ जुलै २०१९ अखेर टप्प्याटप्प्याने सुमारे रुपये ५,८०० कोटी इतकी रक्कम अदा केली असून आता रू.४५३ कोटी रक्कम अदा करणे प्रलंबित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात विशेषत: नाशिक जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांचा राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेमध्ये समावेश करण्याबाबत

(२६) १३७३८८ (१०-०७-२०१९). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयासह संपूर्ण राज्यात केंद्रीय राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमाची अंमलबजावणी सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय योजनेअंतर्गत नव्याने लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी दिनांक ३ मार्च, २०१७ च्या शासन निर्णयाप्रमाणे जिल्हानिहाय सुधारित इष्टांक देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयाप्रमाणे राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत योग्य व गरजू लाभार्थ्यांची निवड करुन त्याद्दष्टीने शिधापत्रिकांचे आधार सिडींगचे काम सुरु करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार नाशिकसह राज्यातील पात्र लाभार्थ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेमध्ये समाविष्ट करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१४-०८-२०१९) : (१) होय.

(२) होय.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमांतर्गत दिनांक ३.३.२०१७ च्या शासन निर्णयान्वये व तद्नंतर दिनांक १६.११.२०१८ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील सर्व जिल्ह्यांच्या जिल्हानिहाय इष्टांकात पुन्हा सुधारणा करण्यात आली आहे.

(३) होय.

(४) राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमांतर्गत जास्तीत जास्त लाभार्थ्यांचा समावेश होण्याच्या दृष्टीने नवीन पात्र लाभार्थ्यांची निवड करताना दि. ३०.०६.२०१९ पर्यंतच्या योग्य व गरजू असलेल्या पात्र शिधापत्रिकाधारकांचा समावेश करण्याबाबतचा निर्णय दिनांक ०६.०७.२०१९ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. त्याअनुषंगाने नवीन पात्र लाभार्थ्यांची निवड करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मालेगांव येथे दुकानदारांकडून होत असलेला रॉकेलचा गैरव्यवहार

(२७) १३७३९५ (०७-०७-२०१९). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) शहरातील ७० टक्के नागरिक दारिद्री रेषेखालील असून शासनाच्या नियमानुसार एका व्यक्तीला दोन लिटर, दोन व्यक्तीला तीन लिटर, तीन व्यक्तीला चार लिटर व चार व्यक्तीपेक्षा जास्त असलेल्या व्यक्तींना चार लिटर अशा प्रमाणे रॉकेलचे वितरण करावे असा शासनाचा नियम आहे पंरतू मालेगांव येथे स्थानिक अन्न व नागरी विभागाचे अधिकारी व परवानाधारक रॉकेल दुकानदार यांच्या संगनमताने प्रती कार्डधारकांस फक्त एक लिटर रॉकेल वाटप करण्यात येत असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकच लिटर रॉकेल मिळत असल्याने दारिद्रय रेषेखालील नागरिकांची गैरसोय होत असून रॉकेल वाटपामध्ये लाखो रुपयांचा गैरव्यवहार होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१३-०८-२०१९) : (१) व (२) हे खरे नाही.

शासन निर्णय दि.२० ऑगस्ट, २०१५ अन्वये विहित केलेल्या परिमाणानुसार मालेगाव शहरातील पात्र शिधापत्रिकाधारकांना केरोसिन वितरित करण्यात येत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

पांढरकवडा तालुक्यात (जि.यवतमाळ) अवैद्य दारूचा व्यवसाय सुरू असल्याबाबत

(२८) १३७५११ (०८-०७-२०१९). श्री.राजु तोडसाम (अर्णी) : सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरकवडा (जि.यवतमाळ) तालुक्यात दीड ते दोन महिन्यांपासून बंद असलेला अवैद्य दारूचा व्यवसाय पुन्हा सुरू झाल्याची बाब माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरासह राष्ट्रीय महामार्गावरील अनेक हॉटेलवर व ढाब्यांवर अवैध दारू विक्री सुरू झाली असून या अवैध दारू विक्रीतून मोठ्या प्रमाणावर कर चुकविला जात आहे, हे ही खरे आहे काय?

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबधित दोषीवर कोणती कारवाई केली तसेच अवैध दारु विक्री व्यवसाय बंद करण्याच्या दृष्टिने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२५-०७-२०१९) : (१), (२), (३) व (४) होय, हे अंशतः खरे आहे.

पांढरकवडा (जि.यवतमाळ) तालुक्यात मार्च, २०१९ मध्ये अवैध मद्य विक्रीच्या धंद्यावर चौकशी करुन वेळीच कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये राज्य उत्पादन शुल्क विभागाने दोषींविरुध्द १२ गुन्हे नोंदविले असून रु.४७,८८४/- इतक्या रकमेचा मुद्देमाल जप्त केलेला आहे.

तसेच पोलीस विभागाने याच कालावधीत २६ गुन्हे नोंदविले असून रु.१३,५२,५१२/- इतक्या रकमेचा मुद्देमाल जप्त केलेला आहे. सराईत गुन्हेगारांकडून चांगल्या वर्तणुकीचे बंधपत्र घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत पोलीस विभागाशी समन्वय साधून संयुक्त मोहिमा तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत विशेष छापे मोहिम राबविण्यात येऊन अवैध मद्य निर्मिती, वाहतुक व विक्री ठिकाणांवर सातत्याने कारवाई केली जाते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

अचलपूर (जि.अमरावती) तालुक्यातील नाफेड नोंदणी केंद्रावर चणा खरेदी केंद्र सुरु करण्याबाबत

(२९) १३७६४४ (१५-०७-२०१९). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात चणा उत्पादक शेतकऱ्यांची आर्थिक अडवणूक टाळण्यासाठी नाफेडच्यावतीने नोंदणी व खरेदी केंद्र सुरु करण्यात आली असूनही अमरावती जिल्हयातील अचलपूर तालुका वगळता ११ केंद्रांवर चणा खरेदीस सुरुवात करण्यात आलेली नसल्याची बाब माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त ११ ठिकाणच्या नाफेड नोंदणी केंद्रावर चणा खरेदी सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. राम शिंदे (१९-०८-२०१९) : (१) नाही.

(२) व (३) अमरावती जिल्हयात हंगाम २०१८-२०१९ मधील हमीभावाने हरभरा (चना) खरेदीसाठी पणन महासंघ, मुंबई यांची ७ खरेदी केंद्रे दिनांक १५/०३/२०१९ पासून आणि विदर्भ पणन महासंघ,नागपूर यांची ५ खरेदी केंद्रे दिनांक ४/०४/२०१९ पासुन सुरु करण्यात आली होती.

दिनांक १२/०६/२०१९ पर्यंत अमरावती जिल्हयात ८,३२५ लाभार्थी शेतकऱ्याकंडून १,१६,४४५.३७ क्विंटल चणा खरेदी करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील आदिवासी फासे पारधी समाजाने नागपूर येथील विभागीय आयुक्तालयावर काढलेला मोर्चा

(३०) १३७६६८ (०८-०७-२०१९). श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी फासे पारधी समाजाच्या लोकांनी त्यांच्या मागण्यांसाठी दिनांक ९ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास नागपूर येथे विभागीय आयुक्तालयावर मोर्चा काढून त्यांचे निवेदन विभागीय आयूक्तांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी फासे पारधी समाजाच्या मागण्यांचे स्वरुप काय आहे,

(३) या मागण्यांवर शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे ?

डॉ. अशोक उईके (०९-०८-२०१९) : (१) हे खरे नाही. श्री.दादाजी आदिवासी फासे पारधी समाज संघटनेने त्यांचे निवेदन विभागीय आयुक्त, नागपूर यांचेकडे दिले नसून दि.०८.०३.२०१९ रोजी मोर्चा काढून विभागीय आयुक्त, अमरावती यांचेकडे दिले आहे.

(२) प्रत्येक फासे पारधी कुटुंबातील एका व्यक्तीस किमान ४ एकर ई-क्लासची शेतजमीन किंवा वन जमीन देणे, शैक्षणिक पात्रतेच्या आधारावर शासकीय नोकरी देणे, फासे पारधी तरुणांवर पोलीस खात्यात तसेच भारतीय सैन्यात नोकरी देणे, फासे पारधी जमातीला आदिम जातीचा दर्जा बहाल करणे, फासे पारधी बेड्याला महसूली गावाचा दर्जा देणे, व्यवसायासाठी रु.१.०० लाख शासकीय अनुदान देणे, व्यवसाय, स्वयंरोजगाराकरीता कर्ज उपलब्ध करुन देणे, जिल्हास्तरावर फासे पारधी आर्थिक विकास महामंडळ स्थापन करणे, मुद्रा योजनेंतर्गत रु.५०,०००/- मुद्रा कर्ज उपलब्ध करुन देणे, फासे पारधी समाजाच्या निर्दोष व्यक्तींचा पोलीसांकडुन शारिरीक व मानसिक छळ होत असल्याबाबत, फासे पारधी बेडयावर कॅम्प लावून जात वैधता प्रमाणपत्र वितरित करणे, फासे पारधी बेडयामध्ये अनेक वर्षापासून वास्तव्य करीत असलेल्यांच्या नावाने गाव नमूना ८ करण्यात यावा व त्यांना घरकुल बांधून देण्यात यावे, फासे पारधी समाजाच्या मुलांकरीता शासकीय आश्रमशाळा सुरु करण्यात यावी, फासे पारधी समाजाच्या प्रत्येक बचत गटाला कुक्कुटपालन तसेच शेळीपालन व्यवसाय सुरू करण्याकरीता रु. १५.०० लाख अनुदान उपलब्ध करुन देण्यात यावे, फासे पारधी समाजाच्या बचत गटांना नोंदणीकृत संस्थेच्या नावाने स्वस्त धान्य दुकान देण्यात यावे, इत्यादी मागण्या त्यांनी केल्या आहेत.

(३) वरील मागण्यांच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत शासन पत्र दि.०३.०४.२०१९ अन्वये संबंधित विभाग व कार्यालयांना कळविले आहे. तसेच संघटनेच्या मागण्यांच्या अनुषंगाने दि.१४.०६.२०१९ रोजी मा.मंत्री (वित्त आणि नियोजन, वने) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली आहे.

शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील पाणीटंचाईबाबत

(३१) १३७६८८ (१०-०७-२०१९). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर तालुक्यातील (जि.ठाणे) ५३ गावे, १४१ पाडयांमध्ये भीषण पाणीटंचाई असून टँकरने पाणीपुरवठा करण्यासाठी प्रशासनाने ९० लाख रुपये खर्च करण्याची तरतूद माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तालुक्यातील टंचाईग्रस्त १८ गावे, ३७ पाडयांना एकूण ५५ हातपंप मंजूर करण्यात आले असून यासाठी टंचाईकृती आराखडयात ३३ लाख रुपयांची तरतूद केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनान चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शहापूर तालुक्यात पाणीटंचाईवर कायमस्वरुपी तोडगा काढण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यांत येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (०८-०७-२०१९) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) शहापूर तालुक्यामध्ये सन २०१७-१८ चे टंचाई कालावधीमध्ये टंचाई कृती आराखडयामध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे टंचाईग्रस्त गावांना पिण्याचे पाणी मिळण्याच्या दृष्टीने टंचाई अंतर्गत आवश्यक उपाययोजना घेण्यात आल्या आहेत.

तसेच शहापूर तालुक्यातील पाणी टंचाई कायमस्वरुपी दूर करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

१. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम, मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम, जलयुक्त शिवार योजना इत्यादी योजना घेऊन कायमस्वरुपी टंचाई दूर होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात आली आहे.

२. तसेच नाशिक जिल्हयातील भावली धरण उद्भव निश्चित करण्यात येऊन टंचाईग्रस्त ९७ गावे व २५९ पाडयांसाठी गुरुत्वाकर्षणाव्दारे पाणी पुरवठा योजना विचाराधीन असून सदर योजनेचा समावेश सन २०१९-२० चे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाचे कृती आराखडयात करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक जिल्हयातील गड किल्ल्यांवरील मंदिरांच्या दुरवस्थेबाबत

(३२) १३९२३९ (११-०७-२०१९). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील ३६ पैकी निम्याहून अधिक किल्ल्यांवर प्राचीन मंदिरे असून यापैकी अनेक मंदिरांची पडझड झालेली आहे परंतु त्याची नोंदच पुरातत्व खात्याकडे नसल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास नाशिक जिल्हयातील किल्ल्यांवर असलेल्या मंदिरांची नोंद करण्याबाबत पुरातत्व खात्याकडून दखल घेतली जाणार आहे काय,

(३) असल्यास, गड किल्ले ही महाराष्ट्राची संस्कृती व वास्तुशास्त्राचा उत्तम नमुना दर्शविणारी ही मंदिरे असल्याने किल्ल्यांचे व मंदिरांचे जतन करण्यासाठी शासनस्तरावर काही धोरणात्मक निर्णय घेण्यात येणार काय,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२७-०८-२०१९) : (१) हे अंशत: खरे आहे.

नाशिक जिल्हयात एकूण ६५ किल्ले असून त्यापैकी ६ किल्ले राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. किल्ल्यांवर असलेल्या मंदिरांची नोंद या विभागाकडे आहे. काळाच्या ओघात सदर मंदिरांची पडझड झाली आहे.

(२) किल्ल्यावर असलेल्या मंदिराची नोंद या विभागाकडे आहे.

(३) नाशिक जिल्हयातील गाळणा किल्ला, अंकाई किल्ला, टंकाई किल्ला, साल्हेर किल्ला व मुल्हेर किल्ला या राज्य संरक्षित किल्ल्यांच्या जतन दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर असून यामध्ये या किल्ल्यांवरील मंदिरांची जतन दुरूस्ती करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सांगली जिल्हयात दुध विक्री दर अवैधरित्या वाढवून दूध विक्री सुरु असल्याबाबत

(३३) १३९३७९ (०५-०७-२०१९). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयात दुध विक्री दर अवैधरित्या वाढवून दूध विक्री सुरु असल्यामुळे ग्राहकांचे प्रचंड आर्थिक नुकसान होत असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करून सांगली जिल्यातील वाढीव दराने होणारी दुध विक्री थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२६-०८-२०१९) : (१) व (२) सांगली जिल्ह्यात आवेष्टित दुधाची छापील किंमतीपेक्षा जादा दराने विक्रीची कोणतीही तक्रार माहे मे २०१९ च्या दरम्यान प्राप्त झालेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर चित्रनगरीचे काम प्रलंबित असल्याबाबत

(३४) १३९४१३ (०७-०७-२०१९). श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील असलेल्या चित्र नगरीचे काम मुंबईच्या धर्तीवर व्हावे अशी कोल्हापूर च्या जनतेची इच्छा असताना चित्रनगरी मधील अनेक महत्वाची कामे ही निधी अभावी प्रलंबित असल्याची बाब माहे मे, २०१९ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर चित्रनगरी येथील कामांचा योग्य आराखडा तयार करण्यात आला आहे काय अथवा तयार केलेल्या आराखड्या नुसार आता पर्यंत किती निधी खर्च करून कोण कोणती कामे पूर्ण करण्यात आली आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२७-०८-२०१९) : (१) हे खरे नाही.

(२) कोल्हापूर चित्रनगरी येथील पहिल्या टप्प्यांच्या कामाचा आराखडा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) यांच्याकडून तयार करण्यात आला आहे.

पहिल्या टप्प्यासाठी तयार करण्यात आलेल्या आराखड्यानुसार रु.११.६६ कोटी इतक्या किंमतीच्या १६ कामांना व संरक्षण भिंत बांधणे याकरिता रु.५.३७ कोटी असे एकूण रु.१७.०३ कोटी इतक्या निधीच्या १७ कामांना मंजूरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार पूर्ण झालेली कामे पुढीलप्रमाणे:-

१.अस्तित्वात असलेल्या स्टुडिओचे नूतनीकरण व विस्तारीकरण (न्यायालय व पोलीस स्टेशनच्या देखाव्याची उभारणी करण्यासह)

२. अस्तित्वात असलेल्या पाटीलवाडयाचे विस्तारीकरण व पहिल्या मजल्यावर महामंडळाचे कार्यालय बांधणे.

३. चित्रनगरी महामंडळ कार्यालयाची अंतर्गत सजावट

४. चित्रनगरीचे मुख्य प्रवेशद्वार व सुरक्षा कक्ष बांधणे.

५. सुमारे २० एकर परिसरात अंतर्गत रस्त्यांची उभारणी, भू अंतर्गत नाले, पथ दिवे, दुभाजक इ. सुविधा निर्माण करणे.

६.चित्रिकरणासाठी आवश्यक असलेले पूल व मोऱ्यांचे बांधकाम करणे.

७. वातानुकूलन यंत्रणा बसविणे.

८. उपरोक्त सर्व ठिकाणी विद्युतीकरण

९. अग्निशमन यंत्रणा

१०.महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण महामंडळाकडून विद्युत पुरवठयाकरिता यंत्रणा प्रस्थापित करणे.

११. सार्वजनिक शौचालय उभारणे.

१२. चित्रिकरणासाठी आवश्यक असणारा बस थांबा व अन्य देखाव्यांची उभारणी करणे.

१३. १० एकर क्षेत्रफळामध्ये बागबगीचा व परिसर विकास (Landscaping & Gardening)

१४. वाहनतळ उभारणे.

१५.अस्तित्वात असलेल्या पाण्याच्या टाकीचे मजबूतीकरण करणे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) तालुक्यातील पाणी टंचाईग्रस्त गावांना नियमित पाणीपुरवठा करण्याबाबत

(३५) १३९५२७ (१०-०७-२०१९). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) पंचायत समितीच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडून तालुक्यातील १७ गावे व ३७ वाडयांची पाणी टंचाई दूर करण्यासाठी कृती आराखडयात समाविष्ट केल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण पुरवठा विभागाच्या दुर्लक्षामुळे तालुक्यातील अनेक ठिकाणच्या बंद अवस्थेत असलेल्या बोअरवेल व विहीरी दुरूस्त न केल्यामुळे नागरिकांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून पनवेल तालुक्यातील पाणी टंचाईग्रस्त गावांना नियमित पाणी पुरवठा होण्याच्यादृष्टीने तातडीने उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (२६-०७-२०१९) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) पनवेल तालुक्यातील पाणी टंचाईग्रस्त गावांना सुरळीत पाणी पुरवठा होण्याच्या दृष्टीने २ टँकरद्वारे १ गाव व ८ वाडयांना दिनांक २३.०४.२०१९ पासून ग्रामपंचायतीच्या मागणीनुसार पाणी पुरवठा सुरु केला आहे.

पनवेल तालुक्यातील ९ गावे व ३ वाडया अशा एकूण १२ ठिकाणी विंधन विहीरी दुरुस्त करुन पाणी पुरवठा सुरु केलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात विशेषत: नवी मुंबई मध्ये मशिनमधील सिमकार्डला नेटवर्क नसल्यामुळे धान्य वाटप प्रक्रियेस विलंब होत असल्याबाबत

(३६) १३९९९७ (१०-०७-२०१९). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्वस्त धान्य दुकानदारांना देण्यात येणाऱ्या धान्याचा काळाबाजार होऊ नये यासाठी सुधारणा करीत धान्यवाटपासाठी बायोमेट्रिक प्रणाली विकसित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबई शहरासह इतर शहरातदेखील वारंवार स्वस्त धान्य दुकानामध्ये असलेल्या मशिनमधील सिमकार्डला नेटवर्कच नसल्यामुळे धान्य विक्री प्रक्रियेस विलंब होत असून लाभार्थ्यांना नाहक त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनस्तरावरून चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (३०-०७-२०१९) : (१) हे खरे आहे.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण प्रकल्पातंर्गत सर्व रास्तभाव दुकानांत ई-पॉसद्वारे Aadhar enabled Public Distribution System (AePDS) प्रणालीचा वापर करुन पात्र लाभार्थ्यांची बायोमेट्रिक ओळख पटवून शिधावस्तूचे वितरण करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अहमदनगर व नाशिक जिल्ह्यात पाणी पुरवठा करणाऱ्या टॅकरच्या बनावट निविदा दाखवून केलेला गैरव्यवहार

(३७) १४०१०१ (११-०७-२०१९). डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त गांवाना पाणी पुरवठा करणाऱ्या टँकरच्या बनावट निविदा दाखवून तसेच ठेकेदारांनी शासकीय दरापेक्षा अधिक दराच्या भरलेल्या निविदा जिल्हा प्रशासनाने मंजूर करुन गैरव्यवहार केल्याचे माहे मे, २०१९ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार अधिक दराच्या निविदांना शासनाने मंजुरी देण्याची कारणे काय आहेत यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (२६-०७-२०१९) : (१) व (२) अहमदनगर जिल्हयातील पिण्याच्या पाण्याकरिता टँकर पुरविण्याकरिता दिनांक ३०.०४.२०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित कमाल दरापेक्षा अधिक दराच्या निविदा प्राप्त झाल्या होत्या. दिनांक १९.१२.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित कमाल दर विचारात घेऊन जिल्हा स्तरावर निविदा अंतिम करण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

कुकुडवाड गावात व या ग्रामपंचायत कार्यक्षेत्रामधील धनवडे वाडीत (ता.माण, जि.सातारा) पाणीटंचाई दूर करण्याबाबत

(३८) १४०१४३ (१०-०७-२०१९). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुकुडवाड गावात व या ग्रामपंचायत कार्यक्षेत्रामधील धनवडे वाडीत (ता.माण, जि.सातारा) तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून पाण्याविना नागरीक व जनावरांचे हाल होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गाव/वाडीत पाण्याचे टँकर नियमित येत नसणे, टँकरने होणारा अपूरा पाणीपूरवठा याबाबत चर्चा करण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालयात आलेले श्री.विष्णू आप्पा धनावडे या शेतकऱ्याचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व तद्नूसार कोणती कार्यवाही केली तसेच मृत्यूमूखी पडलेल्या शेतकऱ्याला कोणती आर्थिक मदत दिली वा देण्यात येणार आहे,
(४) असल्यास, उर्मुळी कॅनॉलचे पाणी कुकूडवाड नजिक भाक्रेवाडी येथे आले असून तेथील विहिरींना भरपूर पाणी असल्याने सदर विहिरी अधिग्रहण करुन ग्रामपंचायतीमार्फत कुकुडवाड गाव व परिसरात पाणीपूरवठा करण्याची तेथील नागरीकांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (२३-०७-२०१९) : (१) कुकुडवाड गाव व या ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील धनवडे वाडीत (ता.माण, जि.सातारा) पाणी टंचाई निर्माण झाली, हे खरे आहे.

(२) कुकुडवाड गावाच्या मागणीनुसार टँकरव्दारे व गावात असलेल्या स्त्रोतामधून गावात टंचाई अंतर्गत पुरेसे पाणी पुरवण्यात येत आहे.

कुकुडवाड अंतर्गत धनवडेवाडी येथील ५-६ ग्रामस्थ व श्री. विष्णू आप्पा धनवडे यांची ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच यांच्यासोबत पाणी टंचाई बाबत चर्चा झाली. परंतु परत जाताना धनवडेवाडीच्या जवळ श्री. विष्णू आप्पा धनवडे यांचा मृत्यू झाला.

(३) याबाबत तहसिलदार, माण यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली असून त्यांच्याकडील कार्यालयीन पत्र दिनांक ०४.०६.२०१९ अन्वये श्री.विष्णू धनवडे यांचा मृत्यू झाला आहे परंतु शव विच्छेदन केलेले नसल्याने मृत्यूचे कारण समजले नाही.

सदर मयत श्री. विष्णू धनवडे यांचे वारसास आर्थिक मदत देता येईल किंवा कसे याबाबत जिल्हाधिकारी, सातारा यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे.

(४) हे खरे नाही.

ग्रामपंचायत कुकुडवाड यांच्याकडून विहिर अधिग्रहणाबाबतचा मागणी प्रस्ताव अप्राप्त आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

महादेव तांडा (ता.भुसावळ,जि.जळगांव) येथे टँकरने पाणी पुरवठा करताना झालेला गैरव्यवहार

(३९) १४०३४० (१०-०७-२०१९). श्री.सुनिल केदार (सावनेर) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ तालुक्यातील (जि.जळगाव) महादेव तांडा येथे गेल्या वर्षभरापासून एम एच १९ झेड १२२० या पाणी टँकरने पाणीपुरवठा करण्याचे आदेश शासनाने दिले होते व सदर पाणी हे भुसावळ वरून घ्यायचे आदेश असताना टँकर मालक जवळ असलेल्या कुर्हे पाने या गावांतील खाजगी विहीरी मधून पाणी पुरवठा करत असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर टँकर मालक पाण्याचे पैसे भुसावळ येथून घेत असून पाणीपुरवठा मात्र कुर्हे पाने इथून करत असल्याने त्यांनी शासनाच्या लाखो रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खर आहे काय,

(३) असल्यास, सदर टँकर मालक व संबंधित अधिकारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (२५-०७-२०१९) : (१) मौजे महादेवमाळ, ता. भुसावळ येथे दिनांक १३/०४/२०१८ पासून टँकर क्रमांक एम.एच.१९ झेड १२९० द्वारे पाणी पुरवठा केला जातो. भुसावळ नगरपरिषदेच्या विहीरीवरुन सदर टँकर भरुन महादेवमाळ गावात पाणी पुरवठा करण्यात येतो. तथापि, नगरपरिषद क्षेत्रातही पाणी टंचाई निर्माण झाल्याने सदर विहिरीवरुन पाणी भरण्यास विलंब होत होता. यामुळे ग्रामपंचायत कु-हे यांचेमार्फत सदर टँकर दिनांक

१६.०४.२०१९ ते दि.१८.०५.२०१९ या कालावधीत खाजगी विहिरीवरुन भरण्याची व्यवस्था करण्यात आली व त्यानुसार कु-हे ग्रामपंचायत क्षेत्रातील मौजे महादेवमाळ येथे टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला. त्यानुसार ग्रामपंचायतीने जिल्हा परिषदेस अवगत केले आहे.
(२) हे खरे नाही.

टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत असलेल्या खाजगी टँकरवर GPS यंत्रणा बसविण्यात आली आहे. GPS यंत्रणेनुसार नोंद झालेल्या अंतरानुसारच देयक अदा करण्यात येईल असे जिल्हाधिकारी, जळगाव यांनी कळविले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

जळगाव जिल्ह्यातील तत्कालीन जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याविरुद्ध शासनाकडे प्रलंबित असलेल्या तक्रारींबाबत

(४०) १४०३४८ (१०-०७-२०१९). श्री.सुनिल केदार (सावनेर) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव येथील तत्कालीन जिल्हा पुरवठा अधिकारी, श्री.राहुल जाधव त्यांच्या प्रशासकीय बाबीबाबत त्यांच्याविरुद्ध शासनाकडे व जिल्हा प्रशासनाकडे विविध स्वरूपाच्या तक्रारी करण्यात आल्या होत्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने श्री.जाधव यांच्याविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०१-०८-२०१९) : (१) होय हे खरे आहे.
(२) तत्कालीन जिल्हा पुरवठा अधिकारी, श्री.राहुल जाधव यांच्या प्रशासकीय बाबीबाबत त्यांच्याविरुध्द शासनाकडे व जिल्हा प्रशासनाकडे विविध स्वरुपाच्या तक्रारी करण्यात आल्याची बाब खरी आहे. श्री.जाधव यांच्याविरुध्द केलेल्या ९ तक्रारींपैकी ५ तक्रारीत काहीही तथ्य आढळून न आल्याने त्या निकाली काढण्यात आल्या असून उर्वरित ४ तक्रारींवर श्री. जाधव यांच्याकडून खुलासा मागविण्यात आला असून प्रस्तुत तक्रारींवर कार्यवाही चालू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील पाणीटंचाई दूर करण्याबाबत

(४१) १४११०९ (१०-०७-२०१९). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील ६३ गावांमध्ये पाणीटंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या टंचाईग्रस्त गावांना टँकर व विहीर अधिग्रहणाच्या माध्यमातून पाणी उपलब्ध करुन देण्याचे प्रशासनाचे प्रयत्न अयशस्वी झाल्याने पंचायत समिती स्तरावर ४ कोटी ७३ लाख रुपयांचा प्रस्तावित कृती आराखडा जिल्हा प्रशासनाकडे पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गावातील पाणीटंचाई दूर करण्याच्यादृष्टीने आराखडयाला मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (२६-०७-२०१९) : (१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी दिनांक १२.१२.२०१८ रोजी टंचाई कृती आराखडा मान्य करण्यात आला असून सदरील आराखडयामधील खालीलप्रमाणे उपाययोजना घेण्यात आल्या आहेत.

१) टँकर ०९ गावामध्ये ११ टँकर सुरु करण्यात आले आहे.

२) अधिग्रहण ६६ गावांमध्ये ९२ विहिर / बोअर अधिग्रहण करण्यात आले आहे.

३) नळ योजना दुरुस्ती व तात्पुरती पुरक योजना एकूण १० कामे मंजुर करण्यात आली असून ०६ कामे सुरु करण्यात आलेली आहेत

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील शिष्यवृत्ती योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना कमी रक्कमेची प्रतिपूर्ती झाल्याबाबत

(४२) १४१२२८ (१०-०७-२०१९). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विभागातील १८,२९५ विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत असलेली रुपये ७२.३२ कोटी शिष्यवृत्तीची रक्कम तंत्र शिक्षण संचालनालयाकडून जमा केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त शिष्यवृत्ती योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना कमी रक्कमेची प्रतिपूर्ती झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१३-०८-२०१९) : (१) हे खरे आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि.७ ऑक्टोबर, २०१७ च्या शासन निर्णयानुसार राजर्षि छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत तंत्रशिक्षण

संचालनालयाकडून मुंबई विभागातील १८,२९५ विद्यार्थ्यांना रुपये ७२.३२ कोटी शिष्यवृत्तीची रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आलेली आहे.

(२) होय.

(३) संबंधित विद्यार्थ्यांना मागणीपेक्षा शिष्यवृत्तीची कमी रक्कम वितरीत झाल्याचे लक्षात येताच याबाबत सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई यांनी सचिव, शिक्षण शुल्क समिती, यांचेशी चर्चा करुन सन २०१६-१७ पूर्वीच्या शिक्षण शुल्काबाबत स्पष्टीकरण प्राप्त करुन घेतले. दि.२७ सप्टेंबर, २०१८ च्या परिपत्रकानुसार शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पूर्वी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रतिवर्ष ८% शुल्क वाढ अनुज्ञेय ठरविल्याने ज्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम कमी मिळाली होती, अश्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या फरकाची रक्कम तात्काळ अदा करण्यात आली आहे.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

श्रीगोंदा (जि.अहमदनगर) पंचायत समितीमध्ये पिण्याच्या पाण्याच्या टँकरना जीपीएस प्रणाली न बसविल्याबाबत

(४३) १४१८७२ (११-०७-२०१९). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिण्याच्या पाण्याच्या शासकीय टँकरचे नियंत्रण जीपीएसद्वारे सुरु असून जीपीएस यंत्रणा बसविणे सक्तीचे असल्याचे शासनाचे धोरण असताना अहमदनगर जिल्हयातील श्रीगोंदा पंचायत समितीमध्ये पिण्याच्या पाण्याच्या टँकरला जीपीएस यंत्रणा बसविण्यात आली नसल्याचे दिनांक १५ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (२६-०७-२०१९) : (१) हे खरे नाही.

सन्माननीय विधानसभा सदस्य, श्रीगोंदा यांनी दिनांक १५ मे, २०१९ रोजी श्रीगोंदा पंचायत समिती कार्यालयास दिलेल्या भेटीवेळी गटविकास अधिकारी व संबंधित लिपिक जिल्हा परिषद कार्यालयातील बैठकीमुळे पंचायत समिती कार्यालयात उपस्थित नव्हते. त्यामुळे टँकरवरील जी.पी.एस. यंत्रणेची माहिती देता आली नाही.

तथापि दिनांक १६ मे, २०१९ रोजी सन्माननीय विधानसभा सदस्य, श्रीगोंदा यांना टँकरवरील जी.पी.एस. यंत्रणा सुरु असल्याचे गट विकास अधिकारी, श्रीगोंदा यांनी प्रत्यक्ष अवगत केले आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे शहरातील व्यापारी बंद पिशवीमधील दुधाची जादा दराने विक्री करीत असल्याबाबत

(४४) १४१९०४ (०५-०७-२०१९). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात व्यापारी बंद पिशवीमधील दुधाचे दर वाढवून पिशवीवरील मूळ किंमतीपेक्षा जास्त किंमत आकारत असल्याने ग्राहकांना विनाकारण अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सबंधित दोषीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२६-०८-२०१९) : (१), (२) व (३) पुणे शहरात व्यापारी बंद पिशवीमधील दुधाची छापील किंमतीपेक्षा जास्त किंमत आकारल्याने वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९ व त्या अंतर्गत असलेल्या नियमानुसार सन २०१८-१९ मध्ये १२ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या त्या अनुषंगाने तपासणी करून ४ आस्थापनांवर खटले नोंद केले आहेत. तसेच माहे एप्रिल, २०१९ ते जून, २०१९ पर्यंत प्राप्त ०२ तक्रारींच्या अनुषंगाने तपासणी करून एका आस्थापनेवर खटला नोंद केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नालासोपारा (ता.वसई, जि.पालघर) येथील शिधापत्रिका धारकांना जवळच्या दुकानातून ऑनलाईन धान्याचा पुरवठा करण्याबाबत

(४५) १४१९५२ (१०-०७-२०१९). श्री.सुरेश लाड (कर्जत) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नालासोपारा (ता.वसई, जि.पालघर) येथील महिला बचत गटाच्या शिधावाटप दुकानातून शिधापत्रिका धारकांना धान्याचा पुरवठा जवळच्या शिधावाटप दुकानातून होण्याबाबत तसेच तो ऑनलाईन करून देण्याबाबतची लेखी पत्राद्वारे मागणी दिनांक १४ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास समर्थन संस्थेने मा. मंत्री, अन्न व नागरी पुरवठा, प्रधान सचिव, अन्न व नागरी पुरवठा यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने सदर प्रकरणाची शासनाने चौकशी करून शिधापत्रिका लाभार्थ्यांना जवळच्या शिधावाटप दुकानातून धान्याचा पुरवठा होण्याबाबत तसेच तो ऑनलाईन करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१४-०८-२०१९) : (१) हे खरे आहे.
(२) सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण प्रकल्पातंर्गत सर्व रास्तभाव दुकानांत ई-पॉसद्वारे Aadhar enabled Public Distribution System (AePDS) प्रणालीचा वापर करुन पात्र लाभार्थ्यांची बायोमेट्रिक ओळख पटवून शिधावस्तूचे वितरण करण्यात येत आहे. तसेच नालासोपारा क्षेत्रात एकूण २५ रास्तभाव दुकाने मंजूर असून त्या सर्व रास्तभाव दुकानांतून धान्य वाटप करण्यात येत आहे. कोणताही पात्र लाभार्थी अन्नधान्यापासून वंचित राहणार नाही, याबाबत योग्य दक्षता घेण्याचे आदेश सर्व क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आले आहेत. ज्या कार्डधारकांची ऑनलाईन नोंद आहे, अशा शिधापत्रिकाधारकांना ई-पॉस द्वारे व ज्या कार्डधारकांची ऑनलाईन नोंद नाही, त्यांना नॉमिनी सुविधेद्वारे कागदपत्रांची पडताळणी करुन ओळख पटवून धान्याचे वितरण करण्यात येते. शिधापत्रिका धारकाचे कार्ड ऑनलाईन असल्यास तो शिधापत्रिका धारक कोणत्याही रास्तभाव दुकानांतून पोर्टेबिलीटीद्वारे धान्य घेवू शकतो.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

तिखी (ता.सोयगाव, जि.औरंगाबाद) येथील विहीरीचे खोलीकरण करण्याबाबत

(४६) १४२२२३ (११-०७-२०१९). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तिखी (ता.सोयगाव, जि.औरंगाबाद) येथील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी पुरवठा विहीरीचे खोलीकरण करण्याची मागणी ग्रामस्थांनी माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गावातील ग्रामस्थांच्या मागणीच्या अनुषंगाने विहीरीचे खोलीकरण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (१३-०८-२०१९) : (१) हे खरे नाही. ग्रामस्थांकडून अथवा गट ग्रामपंचायत कार्यालय, निमखेडी यांच्याकडून कोणतेही निवेदन प्राप्त झालेले नाही.

तथापि, दिनांक ३० एप्रिल, २०१९ रोजी गट ग्रामपंचायत निमखेडी, ता. सोयगाव यांनी सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने दिनांक ०९.०५.२०१९ रोजी १२००० लिटर क्षमतेची दररोज १ टँकर फेरी मंजूर केलेली आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील वृध्द कलाकारांच्या मागण्यांबाबत

(४७) १४२६९० (१०-०७-२०१९). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वृध्द कलाकारांकरीता कलाकार महामंडळाची निर्मिती करावी, त्यांच्या मानधनामध्ये ५०००/- रुपयांची वाढ करावी, जिल्हयातील प्रतिवर्षी कलाकार निवडताना असलेली ६० ची अट वाढवून १२० करावी, कलाकारांच्या उत्पान्नाच्या दाखल्यामध्ये वाढ करणे तसेच मानधनात दीडपट वाढ करणे इ. विविध मागण्यांचे लेखी विवेदन लोकप्रतिनीधींनी मा.मुख्यमंत्री व मा.सांस्कृतिक कार्यमंत्री यांचेकडे लेखी निवदनाव्दारे दिनांक १७ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वृध्द कलाकरांच्या संख्येत तसेच मानधनामध्ये वाढ करण्यासह अन्य मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०६-०८-२०१९) : (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील वृध्द कलाकारांकरिता त्यांच्या मानधनामध्ये रु.५,०००/- ची वाढ करावी, जिल्हयातील कलाकार निवडताना असलेला प्रतिवर्षी ६० कलाकार हा इष्टांक वाढविणे, कलाकारांच्या उत्पन्नाच्या दाखल्यामध्ये वाढ करणे तसेच मानधनात दीडपट वाढ करणे इ. प्रकारच्या विविध मागण्यांची निवेदने वेगवेगळया दिनांकांच्या पत्रान्वये प्राप्त झालेली आहेत.

(२) याबाबत इष्टांक वाढ तसेच मानधन वाढीबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मोझरी (ता.चिखलदरा, जि.अमरावती) गावातील पाणीटंचाई दूर करण्याबाबत

(४८) १४२८९७ (११-०७-२०१९). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोझरी (ता.चिखलदरा, जि.अमरावती) या ७०० लोकवस्तीच्या गावात तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून गावातील विहिर आटली असून हातपंपही कोरडे पडले असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे येथील ग्रामस्थांनी नदीत खड्डा करुन झरा काढला असून तेच पाणी नागरीकांना प्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यांसदर्भात शासनाने चौकशी करुन येथील ग्रामस्थांना नियमित व स्वच्छ पाणीपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (२६-०७-२०१९) : (१) हे खरे नाही.

मोझरी (ता.चिखलदरा, जि.अमरावती) या गावाची सध्याची लोकसंख्या सुमारे ६०५ आहे. गावामध्ये विंधन विहिरीवरुन कायमस्वरुपी पाणी पुरवठा योजना आहे. तसेच गावात एक हातपंप असून गावालगत एक खाजगी विहीर आहे.

माहे, मार्च २०१९ मध्ये या सर्व उद्भवांना मुबलक पाणी असल्यामुळे त्यादरम्यान पाणी टंचाई निर्माण झाली नव्हती.

(२) हे खरे नाही.

दोन वर्षापूर्वी ग्रामस्थांनी नदीत बुडकी तयार केली होती परंतु हया बुडकीमधील पाण्याचा वापर सध्या पिण्यासाठी करण्यात येत नाही.

(३) दिनांक १८.०३.२०१९ रोजी कायमस्वरुपी पाणी पुरवठा योजनेच्या विंधन विहिरीवरील विद्युत पंप नादुरुस्त झाला होता. ग्रामपंचायतीमार्फत सदर विद्युत पंप दुरुस्त करण्यात येऊन दिनांक २९.०३.२०१९ पासून गावामध्ये पूर्ववत पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे. या कालावधी दरम्यान गावातील हातपंपाचे व गावालगतच्या खाजगी विहिरीचे पाणी ग्रामस्थ पिण्यासाठी वापरत होते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सिमेंटची दरवाढ केल्यामुळे बांधकाम क्षेत्र व पंतप्रधान आवास योजना राबविण्यात अडचणी निर्माण झाल्याबाबत

(४९) १४३१०६ (१३-०७-२०१९). श्री.बसवराज पाटील (औसा) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दरवर्षीप्रमाणे यंदाही देशातील ६ ते ७ मोठ्या सिमेंट कंपन्यांनी सिमेंटची दरवाढ केली असून त्याचा फटका बांधकाम क्षेत्र व पंतप्रधान आवास योजनेला बसत असल्याचे दिनांक २० मे, २०१९ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गतवर्षी दरवाढीनंतर केंद्रीय स्पर्धा आयोगाने सिमेंट कंपन्यांवर ६ हजार कोटी रुपयांचा दंड आकारला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहु दंडाचा भरणा करुन घेणे आणि यंदाही मनमानी पद्धतीने सिमेंट दरवाढ केल्याबद्दल शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२९-०७-२०१९) : (१) केंद्र शासनाने दि.०१.०३.१९८९ पासून सिमेंट नियंत्रण आदेश, १९६७ मधून सिमेंटचे उत्पादन, किंमत व वितरण यावरील निर्बध काढून टाकले आहेत. महाराष्ट्र सिमेंट (अनुज्ञप्ती व नियंत्रण) आदेश, १९७३ दि.३०.१०.१९९० च्या अधिसूचनेद्वारे रद्द करण्यात आले आहेत. त्यामुळे सद्यस्थितीत सिमेंटच्या किंमतीवर राज्य शासनाचे नियंत्रण नाही.

(२) सदर बाब राज्य शासनाच्या अखत्यारितील नसून, केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

अमरावती शहराला पाणीपुरवठा करणारी नेरपिंगळाई ते तपोवन या जलवाहिनीचे नुतनीकरण करण्याबाबत

(५०) १४३३१३ (२४-०७-२०१९). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती शहराला पाणीपूरवठा करणारी अप्परवर्धा धरण ते जलशूध्दीकरण केंद्रापर्यतच्या मूख्य जलवाहीनीपैकी नेरपिंगळाई ते तपोवन या मुख्य जलवाहीनीचे नुतनीकरण करण्याच्या रूपये १९७ कोटी खर्चाच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्याबाबत मा.पाणी पुरवठा मंत्री यांनी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त जलवाहीनीच्या सदर अंदाज पत्रकास तांत्रिक मान्यता देण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (२२-०८-२०१९) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, तांत्रीक मान्यता देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

सचिव
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.